ईनकॅमेरा प्रकरण क्रं. :— ३९८/पीडब्ल्यू/२०१८

दि. ०५/०३/२०२२. निशाणी क्रं. :— २०

साक्षीदार क्रं. :— १

माझे नाव :— अनुश्री जयदीप पाटील.

वय :— २६ वर्षे. कामधंदा :— गृहिणी.

सध्या राहणार :— कुर्ला (प), मुंबई. सध्या रा. अकोला.

सरतपास स.स.अभियोक्ता श्री गवळी यांच्या मार्फत

सरकारी वकिलांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर आढळून आले. सबब साक्षीदाराची साक्ष त्याच्या सांगण्याप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

घटना दि.२४/०६/२०१८ रोजी घडली आहे. त्या दिवशी मी जोगेश्वरी येथे मैत्रिणीला भेटण्यासाठी दुपारी १२.३० वाजता गेले होते. जोगेश्वरी येथून मी बांद्राला जाण्यासाठी फलाट क्रमांक २वरून अप चर्चगेट लोकल ट्रेन पकडली होती. माझे पती सांताक्रुझयेथून याच गाडीत बसून माझेच गाडीत येणार होते. जोगश्वरीयेथे मी महिलांचे राखीव सेकण्ड्क्लास जनरल डब्यामध्ये बसले होते. गाडी सांताक्रुझयेथे पोहचल्यानंतर मी माझ्या डब्यातून खाली उतरले. माझे डब्यातून खाली उतरून मी माझे पती ज्या डब्यामध्ये बसले होते त्या डब्यात चढले. मी डब्यातून खाली उतरल्यानंतर तेथे काहीही घटना घडली नाही.

२. परंतू त्यापूर्वी मी लेडीज डब्यात बसले असताना आमच्या डब्यालगत असलेल्या डब्यातून एक मुलगा मला हातवारे करून खानाखुणा करत होता. मी व माझे पती बांद्रा स्टेशनयेथे उतरलो. त्याचवेळी तो मुलगा दुसऱ्या डब्यातून खाली उतरला. मी

त्यास ओळखले व लगेच माझे पतीला त्या बाबत माहिती दिली. त्यानंतर मी व माझे पती त्या मुलाला घेवून बांद्रा रेल्वे पोलीस स्टेशनमध्ये आलो व तेथे मी त्या मुला विरूध्द् फिर्याद दिली.

३. मी पुन्हा सांगते की मी जेव्हा सांताक्रुझ रेल्वे स्टेशन येथे उतरले तेव्हा तो मुलगा माझेजवळ आला व त्याने माझेकडे माझा मोबाईल क्रमांक मागितला होता. त्यानंतर मी लगेच माझे पतीला फोन करून त्याची माहिती दिली. मी जेव्हा माझे पतीला फोन केला तेव्हा त्यांची कामावरून सुटट्ी झाली होती व ते तेथे एक मिनिटात पोहचतच आहे असे त्यांनी मला सांगितले. त्यानंतर ते एक मिनिटात तेथे पोहचले. परंतू माझे पती तेथे पोहचेपावेतो तो मुलगा दुसऱ्या डब्यात चढला होता. त्यामुलाचे नाव इरफान असल्याचे मला पोलीस स्टेशनमध्ये समजले.

४. आता मला मी दिलेली फिर्याद दाखवली. त्यातील मजकूर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे ती मी ओळखते. सदर फिर्याद नि. क्र. २१ वर आहे. सदर मुलगा इरफान म्हणजे आरोपी यास पाहिल्यास मी ओळखू शकेल. तो आज न्यायालयात हजर नाही. (आरोपी तर्फे गैरहजरी माफिचा अर्ज नि. क्र. १९ वर दाखल करण्यात आलेला असून ओळखी बाबत कोणताही वाद उपस्थित केलेला नाही).

सरतपास संपला.

उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री व्होरा यांच्यामार्फत

५. जोगेश्वरीयेथून बसल्यानंतर मी सांताक्रुझ येथे उतरण्यापूर्वी माझे माझ्या पतीशी बोलणे झाले होते. आरोपीने बाजूच्या डब्यातून मला हातवारे केले होते याचा मला भास झाला होता म्हणून ती बाब मी फिर्याददेते वेळी पोलीसांना सांगितली नव्हती. मी लेडीज डब्यातून उतरल्यानंतर आरोपी इरफान माझ्या पाठीमागे जेन्टस् डब्यातून सांताक्रुझ स्टेशनवर खाली उतरला होता. हे म्हणने खरे आहे की, मी लेडीज डब्यातून उतरल्यानंतर दुसऱ्या डब्यात जाण्यापूर्वी आरोपीने माझेकडे मोबाईल नंबर मागितला होता.

६. मी फिर्याद देते वेळी पोलीसांना असे सांगितले नव्हते की मी सांताक्रुझ येथे पोहचल्यानंतर माझे पती ज्या डब्यात बसले होते त्या डब्यात मी चढले होते. कारण मी उतरल्यानंतर माझे पती तेथे एक मिनिटातच पोहचले होते व त्यांनतर आम्ही दोघे डब्यात चढलो होतो. सांताक्रुझ स्टेशन येथे आम्ही थांबलो नव्हतो व त्याच गाडीने आम्ही दोघे बांद्रा रेल्वे स्टेशनला गेलो. हे म्हणने खरे आहे की, सदर घटनेची माहिती मी माझे पतीला सांताक्रुझ ते बांद्रा प्रवासादरम्यान सांगितली होती.

७. सांताक्रुझ रेल्वे स्टेशनयेथे जेव्हा आरोपीने माझेकडे मोबाईल क्रमांक मागितला तेव्हा मी कोणताही आरडा ओरडा केला नाही किंवा तेथे उपस्थित असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांची मदत

मागितली नाही. मी तेथे उपस्थित असलेल्या इतर कोणत्या प्रवाशाची देखील मदत घेतली नाही किंवा त्यांच्याकडे तशी तक्रार उपस्थित केली नाही.

८. सांताक्रुझ रेल्वे स्टेशन येथे उतरल्यानंतर मी आरोपी इरफानचा शोध घेईपर्यंत सदर गाडी निघून गेली व त्यानंतर मी दुसरी गाडी पकडली व ती गाडी खार रेल्वे स्टेशनयेथे पोहचल्यानंतर मी माझे डब्यातून उतरून माझे पती ज्या डब्यात बसले होते तेथे गेले, असे घडले होते हे मला आठवत नाही. माझे फिर्यादीमध्ये अधोरेखित भाग 'अ' कसा आढळून येतो याचे कारण मला सांगता येईल. सदर घटनेनंतर माझा अपघात झाला होता व माझे डोक्याला मार लागला होता. तेव्हापासून मला बऱ्याचशा गोष्टींचा विसर पडला आहे व बऱ्याचशा गोष्टी स्पष्टपणे आठवत नाहीत. याच कारणास्तव जरी मी माझे फिर्यादीतील अधोरेखित भाग 'अ' फिर्याददेतेवेळी सांगितला असेल तरी तो आता मला आठवत नाही.

९. असे घडले होते की मी सांताक्रुझ येथे बसले व खार स्टेशनयेथे उतरले व तेथून माझे पती ज्या डब्यात बसले होते त्याडब्यात गेले होते. माझे पती सांताक्रुझ येथून माझे सोबत बसले नव्हते. ते खार रेल्वे स्टेशनयेथून माझे सोबत आले होते. माझे माझ्या पतीशी फोनवरून बोलने झाले होते त्यामूळे माझे पती कोणत्या डब्यात आहेत याची मला माहिती मिळाली होती. जेव्हा मी व माझे पती आरोपीला घेवून बांद्रा रेल्वे पोलीस स्टेशनला घेवून जात होतो तेव्हा आरोपीने पळून जाण्याचा अजिबात प्रयन्त केला नाही.

१०. हे म्हणने खरे नाही की, आरोपी माझ्या बाजूच्या डब्यामध्ये होता अथवा त्याने मला कधीही हातवारे केले नाहीत. हे म्हणने खरे नाही की, सांताक्रुझ रेल्वे स्टेशनयेथे उतरल्यानंतर आरोपी देखील माझे पाठीमागे उतरला व त्याने माझेकडे फोननंबर मागितला असे मी खोटे सांगत आहे. हे म्हणने खरे नाही की आरोपी आमच्या आजू बाजूच्या कोणत्याही कम्पार्टमेंण्टमध्ये नव्हता. हे म्हणने खरे नाही की, आरोपीच्या ओळखी संदर्भात मला गैरसमज झालेला असून त्या गैरसमजामधून मी आरोपी विरूध्द् फिर्याद दाखल केली आहे. ज्या व्यक्तिने माझेकडे फोन नंबर मागितला होता तो आरोपी नव्हता हे म्हणने खरे व बरोबर नाही.

उलटतपास संपला.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत
समक्ष
स्वाक्षरी/–
(जि. चं. ढेंगळे)
महानगर दंडाधिकारी,
३६वे न्यायालय, मुंबई सेंट्रल, मुंबई.

दि.०५/०३/२०२२.
सराद.